“आदिवासी शेतकऱ्यांच्या पीक रचनेचा व वित्तीय स्त्रोतांचा चिकित्सक अभ्यास” : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या मानव्यविद्या शाखेअंतर्गत अर्थशास्त्र या विषयातील पीएच.डी. पूर्व सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

शिवकुमार केशवराव पांचाळ

एम.ए., एम.फिल. (अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ.सोनाजी पतंगे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत

मार्च : २०२२

प्रस्तावना

जगातील आदिवासी जमातीचे काही प्रमुख प्रदेश आहेत. यामध्ये रेड इंडियन - उत्तर अमेरिका, गॉशो - दक्षिण अमेरिका, ॲबॅरिजन - ऑस्ट्रेलिया, माओरी - न्यूझीलंड या प्रदेशामध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी जमाती आढळून येतात. जगातील विविध देशात साधारणपेणे जंगलामध्ये वास्तव्य करणाऱ्या मूळ निवासी किंवा आदिवासी जमाती समूहांनी पर्यावरण जपण्याचे मोलाचे कार्य केले. या आदिम जमातींचे अस्तित्व मान्य करण्यासाठी आणि या जमातींना सुविधा पुरविण्याकडे लक्ष वेधणे व त्या मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने ९ ऑगस्ट १९९४ या दिवशी आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस म्हणून जाहीर केला. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाने आदिवासी समुदायाच्या अधिकाराच्या संरक्षणार्थ १९९३ हे वर्ष जागतिक आदिवासी वर्ष म्हणून घोषित केले. तसेच १९९४ ते २००५ हे दशक आदिवासी दशक म्हणून साजरे केले.[१]

भारतीय संविधानाच्या कलम ३४२ नुसार मागासलेले म्हणून जे वर्ग राष्ट्रपतींद्वारा जाहीर केले जातात. त्यांनाच आदिवासी जमाती म्हणून ओळखले जाते. अनुसूचित जमाती ही संज्ञा प्रथम सायमन कमिशनने वापरली व तीच पुढे १९३५ च्या कायद्यात अंतर्भूत करण्यात आली. १९६१ जनगणनेप्रमाणे भारतातील अनुसूचित जमातींची लोसंख्या २९८४६३०० एवढी असून ती भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ६.८ टक्के होती. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात आदिवासी जमातीची लोकसंख्या १०,४२,८१,०३४ एवढी असून तीचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण ८.६ टक्के आहे. या जमातींपैकी जवळजवळ निम्या जमाती मध्य प्रदेश, ओरिसा आणि बिहार राज्यात आहेत. अनुसूचित जमातींना भारतात वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. राज्यघटनेतील अनुसूची ५ आणि कलम ४६ अंतर्गत आदिवासी जमातीचा उल्लेख आहे. त्यामुळे संविधानाने मान्यता दिलेल्या जमातींना अनुसूचित जमाती म्हणून ओळखले जाते. भारतातील सर्वात जास्त जमाती मध्य प्रदेशात असून त्यानंतर बिहारमध्ये आहेत. दिल्ली, पाँडेचेरी, हरियाणा, चंदीगड आणि पंजाब ही अशी राज्ये आहेत तिथे आदिवासी जमाती नाहीत. गोंड, भिल्ल, संथाल, मुंडा, खासी, गारो, अंगामी, भुतिया, चेंचू, कोबाडा आणि ग्रेट अंदमानी जमाती या भारतातील सर्वात सामान्यपणे ओळखल्या जाणाऱ्या जमाती आहेत. या सर्व

जमातींपैकी २०११ च्या जनगणनेनुसार भिल्ल आदिवासी जमातीची संख्या भारतात सर्वात जास्त असून ती एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ३८ टक्के एवढी आहे. या जमाती भारतात महाराष्ट्र, छतीसगढ, गुजरात, राजस्थान आणि त्रिपुरा राज्यांमध्ये आहेत. गोंड आदिवासी जमात भारतात दुसऱ्या स्थानी असून आदिवासी जमातीच्या एकूण लोकसंख्येच्या ३५.६ टक्के लोकसंख्या यांची आहे. भारतात सुमारे ६४५ भिन्न आदिवासी जमाती आहेत.[२]

महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौरस किमी. एवढे असुन त्यापैकी ५०,७५७ चौरस कि.मी. क्षेत्र आदिवासी जमातीने व्यापले आहे. महाराष्ट्रात २००१ च्या जनगणनेनुसार आदिवासी जमातींची लोकसंख्या ८५.७८ लक्ष होती यांचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण ८.८५ होते तर २०११ च्या जनगणनेनुसार ती १०५.१० लक्षवर पोहोचली असून तिचे एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण ९.३५ टक्के आहे. महाराष्ट्रात आदिवासी जमातीची जमाती निहाय लोकसंख्या पाहिली असता भिल्ल २१.२ टक्के, गोंड १८.१ टक्के, महादेव कोळी १४.३ टक्के, वरळी ७.३ टक्के, कोकणा ६.७ टक्के आणि ठाकूर ५.७ टक्के या प्रमाणा आदिवासी जमातीची लोकसंख्या आहे.[३]

एखाद्या देश किंवा प्रदेशात विशिष्ट काळात निरनिराळ्या पिकांच्या लागवडीसाठी किती क्षेत्र आले आहे, यास पीक रचना असे म्हणतात. भारतात शेती व उदरनिर्वाह यांचा प्रमुख व्यवसाय म्हणून शेतीकडे पाहीले जाते. जुनी व परंपरागत शेती करण्याची पद्धत, अशिक्षितपणा, अंधानुकरण, देवभोळेपणा, दारिद्र्य इत्यादी कारणांमुळे पीक रचनेत फारसा बदल न करता एकच पद्धत वापरली जात होती. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर वाढल्या लोकसंख्येला तोंड देण्यासाठी शेतीमध्ये विकास करण्याची गरज भासली, त्यामुळे भारतातील पीक रचनेत बदल होत गेला. नवीन तंत्रज्ञान, नवीन संशोधन पद्धती, मातीचा अभ्यास, जास्त पीक देणाऱ्या अन्नधान्याच्या जाती, संकरीत बी-बियाणे, शेती करण्याच्या नवीन पद्धतीमुळे भारतीय शेतीचा जोमाने विकास होत आहे. आदिवासी शेतकरीसुद्धा पूर्वी जंगल तोड करून झुम पद्धतीने स्थलांतरीत शेती करीत होते. आज ते स्थिर शेतीकडे वळलेले दिसून येतात.[४]

पीक रचना कायम सारखी राहू शकत नाही. कारण मातीचे स्वरूप, हवामानाचा प्रकार, पर्जन्यमानाचे प्रमाण, रासायनिक खते, आधुनिक अवजारे, उच्च पैदास करणारे बी-बियाणे,

जैविक तंत्रज्ञान, शेती, शिक्षण, भांडवल, मजूर, बाजारपेठा, वाहतूक उत्पादन खर्च, सरकारची शेतीविषयक धोरणे इत्यादीचा पीक रचनेवर परिणाम होत असतो.

पीक रचनेचे साधारणपणे दोन भागात विभाजन केले जाते. यामध्ये जो हंगाम जुनच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये संपतो त्यास खरीप हंगाम असे म्हणतात. दक्षिण व पश्चिम मान्सूनच्या पावसामुळे या हंगामात खरीपाची पीके घेतली जातात. यात मुख्यत्वे बाजरी, ज्वारी, मका कांदा, भुईमूग, भात कपाशी, सोयाबीन इत्यादींचा समावेश होतो. तर पावसाळ्यानंतर हिवाळ्यात पीके घेण्याच्या पद्धतीला रब्बी हंगाम असे म्हणतात. यात मुख्यत्वे गहू, मोठी ज्वारी, हरभरा इत्यादी पीके घेतली जातात.[५]

पूर्वी आदिवासी पूर्णतः निसर्गावर अवलंबून असल्याने ते शेती करत नसत. केवळ शिकार आणि फळे व कंदमुळे यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालत होता. परंतु जस-जसे जंगलाचे प्रमाण कमी होत गेल्याने त्यांना शिकार मिळणेदेखील कठिन झाले. त्यामुळे त्यांनी इतर लोकांकडे पाहून शेती करण्यात सुरूवात केलेली दिसून येते. आदिवासी शिकारीकडून हळूहळू शेतीकडे वळताना त्यांच्या कुटुंबव्यवस्थेवर होत गेलेले परिणाम आणि त्यात घडत गेलेला बदल मिलिंद बोकील यांनी आपल्या पुस्तकात नांदेवलेला आहे. तो फार महत्त्वाचा आहे. त्यांनी असे म्हटले की, ‘‘स्थिर शेती आणि एकत्र कुटुंबव्यवस्था यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात पितृसत्ताक व्यवस्था उभी राहिली आणि त्यामुळे शेतकरी समाजात स्त्री-पुरूष संबंधना एक वेगळेच वळण मिळाले. परूष हा सर्व साधनसंपत्तीचा ‘मालक ’आणि स्त्र ही फक्त कष्टाची ‘धनीण’ असा लिंगभेदभाव निर्माण झाला. कृषीप्रधान समाजात जिथे बैल व नांगराच्या सहाय्याने पुरूष शेती करत, तिथे स्त्रियांचे काम फक्त पुनरूत्पादनाचे राहिले आणि त्यांचे क्षेत्र चूल व मूल यापुरते मर्यादित झाले.[६] शेतीतून जास्तीचे धान्य पैदा होत असल्याने स्त्रियांना उत्पादनाच्या कामातून हटवून केवळ पुनरूत्पादनाच्या कामात गुंतवणे शक्यही झाले. कातकऱ्यांची अर्थव्यवस्था अतिरिक्त धान्याची नव्हती. त्यांना रोजच्या रोज अन्न शोधणे भाग असे. त्यामुळे त्यांच्यातीली स्त्री ही उत्पादन कार्यातली महत्त्वाची भागीदार होती. हे जगभराच्या अन्नसंग्राहक समूहांबाबतही खरे आहे, मग ते आदिवासी ऑस्ट्रलियातले असोत की आफ्रिकेतले. अन्न गोळा करणाच्या प्रक्रियेत स्त्रियांचा वाटा पुरूषापेक्षा अधिक असतो. त्यांचे

ज्ञान पुरूषांपेक्षा चांगले असते. त्यामुळे ग्रामीण समाजात जसे स्त्रियांना दुय्यम स्थान प्राप्त होते तसे आदिम समूहात होत नाही याची प्रचिती कातकऱ्यांमध्ये अनेक मार्गांनी येते. ग्रामीण पितृसत्ताक पद्धतीची सर्वात मोठी प्रथा म्हणजे बायकोने नवऱ्याच्या घरी नांदायला जाणे. दुसरा पर्याय असतच नाही. कातकऱ्यांमध्ये मात्र नवऱ्याने बायकोच्या घरी नांदायला जाऊन राहायची प्रथा सर्रास आहे.

आदिवासी शेतकऱ्यांनी पेरणी केल्यानंतर पुढच्या कामांचे वर्णन मेश्राम यांनी वरील कवितात केले आहे. ते म्हणतात की, मोटेच्या पाण्याने ढोलकीचे बोल उमटले. वाऱ्याने बासरी छेडली अन् जमिनीत डोकं खुपसून लपलेल्या लसणाने छछोर मिरच्यावर डोळे मिचकावले. हे संगीत देवते! तुला आम्ही वंदन करतो, तुझ्याकडून आशील मागतो. शेत पिकतं आणि सुरू होते लुटालूट. ही लूटालूट करणारे जे व्यापारी, सावकार, सरकार यांचाही उल्लेख केला आहे. महाराष्ट्रातील सुमारे ८५ टक्के आदिवासी लोकसंख्या ही शेती व्यवसायात गुंतलेली आहे. त्यापैकी ४० टक्के आदिवासी शेतकरी असून ४५ टक्के आदिवासी शेतमजूर आहेत.[७] म्हणून आजही आदिवासींची अर्थव्यवस्था ही कृषी संलग्न व्यवसायावर प्रामुख्याने अवलंबून असल्याचे दिसून येते. बहुसंख्य आदिवासी कुटुंबे ही त्यांच्या उत्पन्नाचे व व्यवसायाचे मुख्य साधन म्हणून शेती व्यवसायावर अवलंबून असली तरी अपुरे तंत्रज्ञान व उत्पादनाची अपुरी साधने ही आदिवासींच्या शेतीची ठळक वैशिष्ट्ये लक्षात घेता आदिवासी क्षेत्रात विविध पीकांचे फार मोठे उत्पादन होऊ शकत नाही. याचबरोबर आदिवासी क्षेत्रात सिंचन सुविधासुद्धा अत्यंत मर्यादित प्रमाणात आहेत.

२००० ते २००१ च्या जनगणनेनुसार सांख्यिकीय आकडेवारीनुसार राज्यात एकूण १२१.०४ लाख शेतकरी असून त्यांच्याकडे १९९.१५ लाख हेक्टर जमीन आहे. त्यापैकी ७.७७ लाख आदिवासी शेतकरी असून त्यांच्याकडे एकूण जमिनीच्या १५.३४ लाख हेक्टर जमीन धारण केली आहे. महाराष्ट्रातील एकूण शेतकऱ्यांपैकी आदिवासी शेतकऱ्यांची संख्या ७ टक्के आहे. राज्यातील सुमारे ८८ टक्के आदिवासी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आहे.[८] यास्तव या योजनेद्वारे ज्या आदिवासी शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न २५,००० पर्यंत आहे त्यांना अर्थसहाय्य

देण्यात येते. आदिवासी शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनात वाढ होण्यासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या विभिन्न बाबींसाठी या योजनेखाली अनुदान दिले जाते.

आदिवासी समाजाची प्रथा, परंपरा, जीवनपद्धती, संस्कृती, लोककला इत्यादी घटकांवर संशोधन झाले आहे. परंतु त्यांची पीक रचना व वित्तीय स्त्रोतांवर मनावे तसे संशोधन झाले नाही. आदिवासी अर्थव्यवस्थेमध्ये स्त्रियांचा सहभाग मोठा आहे. ४३.७ टक्के आदिवासी स्त्रियां आणि ५४.७४ टक्के आदिवासी पुरूषांचा त्यांच्या अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष सहभाग आहे.[९] मोठे मनुष्यबळ अर्थव्यवस्थेमध्ये गुंतलेले असले तरी उदरनिर्वावाहची साधने व तंत्रे अतिशय जुनाट, पारंपारिक व अकार्यक्षम असल्यामुळे उत्पादकता कमी व कमी उत्पन्नामुळे पिढ्यानपिढ्या दारिद्र्याचे सातत्य आहे. हे आर्थिक आणि व्यावसायिक दुर्देव भारतीय आदिवासींच्या वाट्याला आले आहे. भारतातील आदिम समाजाची आर्थिक समस्या ही मूलभूत व महत्त्वपूर्ण आहे. अन्न, वस्त्र, व निवारा याच मूलभूत गरजांच्या पूर्तीसाठी संबंध मानवी जमातीची धडपड चालेली असते. व्यक्तीचे व समुदायाचे अस्तित्व याच आर्थिक गरजांच्या पूर्तीवर अवलंबून असते. किंबहुना मानवी समाजाची आजची सर्वंकष प्रगती प्राथमिक गरजांच्या पूर्तीनंतर झालेली आहे.

त्यांच्या निर्वाहप्रधान अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट केवळ दैनंदिन गरजांची पूर्ती हेच असते. फायदा मिळविणे हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे ध्येय आदिमांच्या अर्थव्यवस्थेत आढळून येत नाही. त्या ऐवजी एकमेकांना मदत करणे व सर्वांना सहभागी करून घेण्याची प्रवृत्ती विशेषत्वाने आढळते. स्त्री-पुरूषांमध्ये श्रमविभाजन आढळते पण विशेषीकरणाचा अभाव आहे. आर्थिक क्रियापार पाडताना निसर्ग शक्तीचाच वापर अधिक करून घेण्यासाठी स्वतःच्या परिश्रमांवरच हे लोक विसंबलेले असतात.

संशोधनाचे महत्त्व

आदिवासी शेतकरी पूर्वी स्थलांतरीत पद्धतीने शेती करत होते. दर वर्षी जंगल तोड करून नवीन ठिकाणी शेती करीत असल्याने या पद्धतीला झूम शेती असेही म्हटले जात होते. परंतु शासनाने जंगल तोड करण्यावर बंधने आनल्याने त्यांच्या स्थलांतरीत शेती करण्याच्या

पद्धतीला आळा बसला. त्यामुळे आता ते स्थिर शेतीकडे वळलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या पीक रचना व वित्तीय स्त्रोतांमध्ये काही बदल झाला आहे का हे पाहणे महत्त्वाचे आहे. तसेच आदिवासींचा परंपरागत त्यासाठी **''आदिवासी शेतकऱ्यांच्या पीक रचनेचा व वित्तीय स्त्रोतांचा चिकित्सक अभ्यास'' : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा** हा विषय निवडला आहे.

समस्यासूत्रण

संशोधनकार्यात समस्येला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. क्षेत्र कोणतेही असो मग ते कृषी, आरोग्य, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक, भौगोलिक, अवकाश, भूगर्भ कामगार इत्यादींमध्ये संशोधन समस्या केंद्रस्थानी असते. संशोधन समस्या निश्चित केल्याशिवाय संशोधनकार्य करणे अशक्य असते. संशोधनाच्या पायऱ्यामध्ये समस्या ही प्रथम पायरी आहे. त्यामुळे, संशोधकाला संशोधन करण्यासाठी सर्वात अगोदर ससस्या निवडणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनात **''आदिवासी शेतकऱ्यांच्या पीक रचनेचा व वित्तीय स्त्रोतांचा चिकित्सक अभ्यास'' : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा** या विषयाचा अभ्यास करण्यासाठी खालील पीकांचा आढावा घेण्यात येईल.

१. एकूण तृणधान्यमध्ये तांदुळ, गव्हू, ज्वारी बाजरी, मका व इतर तृणधान्याचा समावेश होतो.
२. एकूण कडधान्यामध्ये तूर, हरभरा, मूग, उडीद व इतर पिकाचा समावेश आहे.
३. नगदी पिकामध्ये ऊस, कापूस, हळद व इतर पिके
४. एकूण तेलबीया : करडई, तीळ, जवस, सुर्यफुल, भुईमूग, सोयाबीन इत्यादी.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. आदिवासी शेतकऱ्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक स्थितीचा आढावा घेणे.
२. आदिवासी शेतकऱ्यांच्या पीक रचनेचा अभ्यास करणे.
३. आदिवासी शेतकऱ्यांच्या वित्तीय स्त्रोतांचा अभ्यास करणे.
४. आदिवासी शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

५. आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

६. आदिवासी शेतकऱ्यांच्या विकासासाठी निष्कर्ष काढून शिफारशी सूचविणे.

संशोधानाची गृहीतके

१. आदिवासी शेतकरी आजही सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा जपतात.

२. आदिवासी शेतकऱ्यांच्या पीक रचनेत बदल झालेले आहेत.

३. आदिवासी शेतकऱ्यांच्या वित्तीय स्त्रोतांमध्ये वाढ झालेली आहे.

४. केंद्र आणि राज्य शासनाने राबविलेल्या विविध योजनांचा लाभ आदिवासी शेतकऱ्यांना झाला आहे.

५. आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे.

संशोधन पध्दती

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधन ऐतिहासिक, सर्वेक्षणात्मक व अनुभववादी स्वरुपाचे असून यात वर्णनात्मक, विश्लेषणात्मक सांख्यिकीय पध्दतीचा वापर करण्यात येईल.[७] सांख्यिकीय माहितीचे प्रमाण दाखविण्यासाठी सारणी, स्तंभालेख आणि वर्तुळ यासारख्या साधनाचा उपयोग करण्यावर जास्तीत जास्त भर असेल.

नमुना निवड

नैसर्गिक व सामाजिक संशोधनामध्ये संभाव्यता व असंभाव्यता या नमुना निवड पद्धतीचा उपयोग होत असतो. संभाव्यता ही नमुना निवड पद्धत मूर्त किंवा वैज्ञानिक पद्धतीशी संबंधीत आहे. तर असंभाव्यता नमुना निवड पद्धत ही अमूर्त किंवा सामाजिक शास्त्राशी संबंधित आहे. प्रस्तुत संशोधन असंभाव्यता नमुना निवड पद्धतीत येत असले तरी आवश्यक त्या ठिकाणी संभाव्यता पद्धतीचासुद्धा अभ्यास करण्यात येईल.

या संशोधनासाठी हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली शहर, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ आणि सेनगाव तालुक्यांचा समावेश केला. हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून

८० उत्तरदात्यांची निवड केली जाईल. म्हणजेच पाच तालुक्यातून ४०० उत्तरदाते निवडले जातील. प्रत्येक तालुक्यातून आदिवासी शेतकरी असलेली १० गावे निवडली जाणार असून प्रत्येक गावातून ०८ उत्तरदात्यांची निवड यादृच्छिक व लॉटरी पद्धतीने केली जाईल. उत्तरदात्यांच्या माध्यमातून मुलाखत व अनुसूचिद्वारे आदिवासी समाजाची संस्कृती, सामाजिक व आर्थिक स्थिती, पीक रचना आणि वित्तीय स्त्रोतांची वस्तुनिष्ठ माहिती संकलीत केली जाईल. समग्र व उपसमग्रातील सजातीयतेच्या तत्त्वामुळे संशोधनातील तथ्य संकलनाच्या गुणवत्तेवर कोणत्याही प्रकारचा विपरीत परिणाम होणार नाही, याची खात्री करुन घेण्यात येईल.

हिंगोली जिल्हा



वरील प्रमाणे माहितीचे संकलन करण्यासाठी नमुन्याची निश्चिती करण्यात आलेली आहे.

माहिती संकलन

संशोधनामध्ये तथ्य संकलनाला अतिशय महत्त्वाचे स्थान असते. तथ्य संकलनाशिवाय संशोधन करणे अशक्य असते. तथ्य संकलनाचे प्रामुख्याने प्राथमिक तथ्य संकलन आणि

द्वितीय तथ्य संकलन असे भाग पडतात. प्रस्तुत विषयांच्या अनुषंगाने तथ्य संकलनासाठी प्राथमिक व द्वितीय तथ्य संकलनाचा उपयोग करण्यात येणार आहे, ते पुढीलप्रमाणे.

माहिती संकलनाचे स्त्रोत

प्राथमिक माहिती संकलन

↓ प्रत्यक्ष निरीक्षण

↓ प्रश्नावली

↓ मुलाखती

↓ अनुसूची

↓ विशिष्टाभ्यास

द्वितीय माहिती संकलन

↓ **सार्वजनिक कागद पत्रे**

↓ शासकीय अहवाल/प्रकाशन

↓ खाजगी संस्थाचे प्रकाशन अहवाल

↓ वर्तमान पत्रे/मासिके/पुस्तके

↓ ऐतिहासिक कागद पत्रे[८]

१.प्राथमिक माहिती संकलन

अभ्यासासाठी निवडलेल्या प्राथमिक माहितीत प्रश्नावलीच्याद्वारे नमुना निवड पद्धतीने हिंगोली जिल्ह्यातील लॉटरी पद्धतीने ४०० उत्तरदात्यांची निवड केली आहे. तसेच उत्तरदात्याकडून मुलाखत अनुसूचिचा उपयोग करून माहिती संकलित करण्यात येणार आहे. त्याच बरोबर उत्तरदात्याकडून माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने प्रश्नावलीचा आधार घेतला जाईल. तसेच उत्तरदात्यांना प्रथम भेट देवून त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेण्यात येईल आणि संशोधन कार्यासाठीची आवश्यक माहिती संकलित केली जाईल. संकलीत माहितीचे सांख्यिकीय आणि संख्यात्मक तंत्रांच्या साहय्याने विश्लेषण करण्यात येईल.

२.द्वितीय सामुग्री

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक सामुग्री बरोबर द्वित्तीय सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यात केंद्र व राज्य सरकार वेळोवेळी प्रसिद्ध केलेले अहवाल, आर्थिक समालोचन अहवाल, संशोधन पत्रिका त्याच बरोबर हिंगोली जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन

अहवाल, जिल्हा जिल्हा गॅझेटिअर, स्थल दर्शक नकाशे, गुगल, वेबसाईट, विविध संशोधन पत्रिका, नियतकालीके, मासिके, ग्रंथ व वृत्तपत्र यातून प्रसिद्ध झालेल्या माहितीचा उपयोग प्रबंध लेखनासाठी केला जाईल.

संशोधनाची मर्यादा

सामाजिक शास्त्र असो की, नैसर्गिक शास्त्र असो यामध्ये हजारो वर्षापासून नानाविध शोध लागले आहेत. तरीसुद्धा त्यांतील संशोधनाची प्रक्रिया खंडीत न होता सातत्याने चालूच राहिली आहे. कारण संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन सुरू होण्यापूर्वी संशोधनाची निश्चित व्याप्ती आणि मर्यादा ठरविणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे अवकाशात विमानाला निश्चित दिशा दाखविण्याचे काम होकायंत्र करीत असते त्याचप्रमाणे संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी संशोधनाला मर्यादा असणे आवश्यक असते. संशोधनाला मर्यादा नसेल तर संशोधन कार्य मूळ उद्देशापासून भरकटत असते. प्रस्तुत संशोधनात **हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या पीक रचना व वित्तीय स्त्रोतांचा अभ्यास करीत असताना इ.स.२०११ ते २०२१** हा कालावधी संशोधनासाठी निश्चित केला आहे. ही संशोधनाची मर्यादा असून अपवादात्मक परिस्थितीमध्ये संशोधनाच्या अनुषंगाने इतरही कालावधीतील काही संदर्भ येऊ शकतात.

प्रकरणाची रूपरेषा

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत पहिल्या प्रकरणामध्ये आदिवासी जमातींचा अर्थ, व्याख्या, वैशिष्टे तसेच संशोधन विषयाची समस्यासूत्रण, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनाची गृहीतके, नमुना निवड, संशोधन पद्धती, माहिती संकलन, संशोधन कालावधी इत्यादीं घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत दुसऱ्या प्रकरणामध्ये "आदिवासी शेतकऱ्यांच्या पीक रचनेचा व वित्तीय स्त्रोतांचा चिकित्सक अभ्यास" या विषयाच्या अनुषंगाने विविध विद्यापीठातील प्रकाशित व अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, शासनाच्या विविध समित्यांचे अहवाल, विविध लेखकांचे संदर्भ ग्रंथ इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण तिसरे : हिंगोली जिल्ह्याची ओळख

प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यासाच्या दृष्टीने हिंगोली जिल्ह्याची ओळख, ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक स्थान व क्षेत्रफळ, हवामान, नदी प्रणाली, प्रर्जन्यमान, मृदा, लोकसंख्या, तालुकानिहाय लोकसंख्येची घनता, साक्षरता, बचतगट, जलसिंचल, सिंचन विहीरी, कुपनलिका, उद्योग, रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक, वीज सेवा, शिक्षण, आरोग्य, पाणी पुरवठा, बँकींग, क्षेत्रफळ, प्रशासकीय विभाग आणि मानव विकास निर्देशांक इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण चौथे : आदिवासी शेतकऱ्यांची पीक रचना

प्रस्तुत प्रकरणामध्ये हिंगोली जिल्ह्यातील आदिवासी भागामध्ये खरीप व रब्बी हंगामात घेतले जाणारे पिके, पीक पद्धतीची रचना, पीक पद्धतीतील बद्दल इत्यादी घटकांचा अभ्यास यामध्ये करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : आदिवासी शेतकऱ्यांचे वित्तीय स्त्रोत

प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासी शेतकऱ्यांच्या वित्तीय स्त्रोतांचा अभ्यास करताना कृषी उत्पादन, वन उत्पादन, शेळी व मेंढी पालन, गुरे व कुकूटपालन, दुग्ध व्यवसाय, कुटीर उद्योग, मजूरी, नोकरी इत्यादी घटकांकडून मिळणाऱ्या उत्पादन स्त्रोतांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सहावे : आदिवासी शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना

प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासी विकास प्रकल्प, आयटीडीपी, अतिरिक्त आदिवासी उपयोजना-एटीएसी, सुधारित क्षेत्र विकास खंड-माडा, लघु सुधारित क्षेत्र विकास खंड-मिनीमाडा, सुकथनकर समितीच्या शिफारशी-१९९१-९२, कृषी व सलग्न सेवा, उद्योग व खनिजे, ग्रामीण विकास, वाहतुक व दळणवळण, विशेष क्षेत्रीय कार्यक्रम, सामान्य आर्थिक सेवा पाटबंधारे, पुरनियंत्रण, विद्युत विकास, शासकीय आश्रमशाळा, समुह सेवा योजना, कन्याशाळा, आदिवासी मुला व मुलिंसाठी शासकीय वस्तीगृहे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, शिष्यवृत्ती, इंगजी माध्यम शिक्षण देणाऱ्या शाळा, संगणक प्रशिक्षण, आदिवासी सेवा पुरस्कार, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, सैनिक भरतीपूर्व प्रशिक्षण, मोटार वाहन प्रशिक्षण, मोटार पंप, न्युक्लिअस बजेट योजना, ठक्कर बाप्पा एकात्मिक वस्तीसुधार योजना इत्यादी योजनाचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सातवे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यासाअंती हाती आलेल्या निष्कर्ष व शिफारशी देण्यात येथील.

संदर्भग्रंथ

१. www.wikipedya.com
२. www.tribal.nic.in
३. www.maharashtra.gov.in
४. संतोष दास्ताने, महाराष्ट्र, नितीन प्रकाशन, पुणे आवृत्ती २०१२, पृ.क्र.१३
५. अटल योगेश, आदिवासी भरत एक सामाजिकए सांस्कृतिक एव विकासात्मक विवेचन, रावत पब्लिकेशनए नई दिल्ली, २०११
६. आहूजा राम, भारतीय समाजए रावत पब्लिकेशन, नई दिल्ली २०१२
७. अनमुलवाड, आदिवासी समाज संस्कृती आणि साहित्य, पुजा पब्लिकेशन, परळी वैजनाथ, बीड, २०१२
८. आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,२०२१

९. रा.ना.घाटोले, सामाजिक संशोधन पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, १९८३
१०. गुरुनाथ नाडगोडे, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१
११. आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, Vol.xxxv No. २ सप्टेंबर २००९
१२. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद विभाग,
१३. लोकराज्य, वेध विकासाचा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, ऑगस्ट २००६
१४. Annual Tribal sub-Plan, Tribal development department Govt. of Maharashtra,
१५. Tribal research bulletin, Tribal research and Traning Institute, Maharashtra state pune, २०१०
१६. Elwin Vearier, The Tribal Arts of Middle, India Bombay, Oxford University Press, New, १९७४
१७. Bose N.K. Nandi Das and Tyagi D.S., Tribal of village system present life in India, Calcatta a Geographical Survey of India, १९६१
१८. Rath Govinda Tribal development in india, Sage publication, New Delhi, २००६
१९. Vose Nirmal kumar Tribal life in india, National book trust, india New Delhi १९७१

संशोधक

शिवकुमार केशवराव पांचाळ

मार्गदर्शक

प्रा. डॉ.सोनाजी पतंगे

अर्थशास्त्र विभाग प्रमुख
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत